ePaper

| वर्ष - 6 | अंक - 210 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार | दिनांक 13 नोव्हेंबर 2022 | मुंबई/पुणे/पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## ऊर्जा उपकरण निर्मिती प्रकल्प राज्याच्या हातून गेल्याने सुप्रिया सुळेंचं टीकास्त्र!



### आतील पानांत


- पुण्यात मार्केट यार्ड परिसरात गोळीबार
- मेट्रो बिट्रो ठीक आहे; पण...
- कृषीपंपाचा वापर वाढल्याने राज्यातील विजेची मागणी २३ हजार मेगावॅटवर


# ठाकरेंची सेनाच मुंबईच्या विकासाची मारेकरी!

## भाजपा मुंबई प्रभारी, आमदार अतुल भातखळकर यांची जहरी टीका

**| मुंबई |**
**| महाईन्यूज | प्रतिनिधी|**

**स्वतःला हिंदुत्व, मराठी आणि मुंबईचे ठेकेदार मानणाऱ्या उद्धव ठाकरे यांनी हिंदू समाज आणि मुंबईतील जनतेत फूट पाडण्याचे घाणेरडे काम सुरू केले आहे. त्यांनी मुंबईच्या विकासात खोडा घालण्याचे काम केले असून मुंबईच्या विकासाची खरी मारेकरी उद्धव ठाकरे यांचीच शिवसेना असल्याची जहरी टीका भाजपा मुंबई प्रभारी आमदार अतुल भातखळकर यांनी केली. मुंबई भारतीय जनता पार्टीच्या वतीने आयोजित 'जागर मुंबईचा' या अभियानांतर्गत जाहीर सभेत ते शनिवारी बोलत होते. कांदिवली येथे भव्य सभा पार पडली. खासदार गोपाळ शेट्टी, आमदार योगेश सागर प्रमुख उपस्थित होते.**

यावेळी अतुल भातखळकर म्हणाले, उद्धव ठाकरे यांचे कर्तृत्व असे आहे की, त्यांच्या नावातून बाळासाहेब ठाकरे यांचे नाव हटवायला हवे. शिवप्रताप दिनानिमित अफजलखानाच्या कबरीवरील अतिक्रमण हटवण्याचे काम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारने केले. मात्र, सामना वर्तमानपत्रात याची बातमी नाही. कंगना राणावतचे घर पाडले



तेव्हा त्याची हेडिंग होती. तुम्ही खोटे हिंदुत्ववादी आहात अशी टीका त्यांनी केली. उद्धव ठाकरे यांनी दगाबाजी करून मुख्यमंत्री पद मिळवले. मुंबईतील अनेक प्रकल्प रोखण्याचे काम उद्धव ठाकरे आणि त्यांच्या मुलाने केले.

कोणत्याही व्यवसाय न करता उद्धव ठाकरे यांची संपत्ती करोडो रुपये कशी? महापालिकेतून येणारे खोके बंद झाल्यामुळे उद्धव ठाकरे अस्वस्थ झाले आहेत असा टोला आ. भातखळकर यांनी लगावला. मुंबई मेट्रोचा वाढत्या खर्चाला उद्धव ठाकरे जबाबदार आहेत. कोरोना काळात उद्धव ठाकरे किंवा त्यांचा मुलगा एकदाही घराबाहेर पडला नाही. भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते बाहेर पडून समाजासाठी काम करत होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे खरे डॉक्टर असून त्यांच्यामुळेच अडीच वर्षे घरात बसलेले घराबाहेर पडू लागले आहेत. आता त्यांचे आजारपण कुठे गेले? असा सवाल भातखळकर यांनी केला. तर आमदार योगेश सागर म्हणाले, घराणेशाहीचा फायदा एका विशिष्ट घराण्याला झाला. मुंबई महापालिकेत ३ लाख करोड रुपयांचा भ्रष्टाचार केवळ एका परिवारामुळे झाला. लांगूलचालन, भ्रष्टाचार तुष्टीकरणाविरोधात उभा राहावे लागेल.

### भ्रष्टाचार रोखण्यासाठी टेंडर सिस्टीम बदलावी

**यावेळी खासदार गोपाळ शेट्टी म्हणाले, मुंबई महानगरपालिकेच्या सभागृहात भारतीय जनता पार्टीच्या सदस्यांनी भ्रष्टाचाराच्या विरोधात आवाज उठवला आहे. मुंबई महानगरपालिका फायद्यात येण्यामागे भारतीय जनता पक्षाचे योगदान आहे. भारतीय जनता पार्टीच्या सदस्यांनी शिवसेनेवर अंकुश ठेवण्याचे काम केले. मुंबई महानगरपालिकेतील भ्रष्टाचार रोखण्यासाठी टेंडर सिस्टीम बदलावी लागेल असेही ते म्हणाले.**

# "एकनाथ शिंदे ५० नव्हे तर २०० खोके देतात..."

## आपल्याच आमदाराचा उल्लेख करत मुख्यमंत्र्यांचं वक्तव्य

**| भंडारा |**
**| महाईन्यूज | प्रतिनिधी|**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे विदर्भ दौऱ्यावर गेले आहेत. यावेळी भंडारा येथे झालेल्या जाहीरसभेतून मुख्यमंत्र्यांनी विरोधकांवर जोरदार टीकास्त्र सोडलं आहे. गेल्या अडीच ते तीन महिन्यात आपल्या सरकारने अनेक विकासकामं केली आहेत. त्यामुळे विरोधकांना धडकी भरली आहे, असं विधान मुख्यमंत्र्यांनी केलं आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आपल्या भाषणात म्हणाले की, राज्यातील विद्यमान सरकार काम करणारं सरकार आहे, हे



सरकार केवळ अडीच-तीन महिन्यातच एवढी कामं करू शकते, तर पुढच्या दोन-सव्वा दोन वर्षात किती कामं करेल, यामुळे विरोधकांना धडकी भरली आहे. त्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. भंडारा मतदारसंघातील शिवसेनेचे आमदार नरेंद्र भोंडेकर यांच्या विधानाचा उल्लेख करत एकनाथ शिंदे म्हणाले, "जसं नरेंद्र भोंडेकर यांनी सांगितलं की, एकनाथ शिंदे ५० खोके देत नाहीत तर २०० खोके देतात, हे पैसे विकास कामांसाठी देतात. तुम्हाला सांगू इच्छितो की, आज सकाळपासून आतापर्यंत २०० कोटीहून अधिक रुपयांची भूमीपूजनं आणि लोकार्पणं केली आहेत. १०० कोटी रुपये केवळ पाईपलाईन प्रकल्पासाठी खर्च झाले आहेत."

"हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग मुंबई ते नागपूर असा आहे. पण आपले आमदार नरेंद्र भोंडेकर आणि आपल्या खासदारांचा आग्रह आहे की, समृद्धी महामार्ग पुढे भंडारा, गोंदिया आणि गडचिरोलीपर्यंत गेला पाहिजे.

# वाकडमधील ५ बाईक रायडर जवानांना देणार अनोखी मानवंदना

## साडेआठ हजार किलोमीटर प्रवास करणार

### भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप यांनी प्रवासासाठी दिल्या शुभेच्छा

**| पिंपरी |**
**| महाईन्यूज | प्रतिनिधी|**

भारताच्या अमृत महोत्सवानिमित्त वाकडमधील ५ बाईक रायडर तरूणांनी देशाची अविरत सेवा करणाऱ्या जवानांना मानवंदना देण्यासाठी पुणे ते अरुणाचल प्रदेशमधील काहो ते परत पुणे असा 8.5 हजार किलोमीटरचा प्रवास करण्यास सुरूवात केली आहे. या पाचही तरुणांना भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक



प्रमुख शंकर जगताप यांनी सुरक्षित प्रवासासाठी शनिवारी (दि.१२) शुभेच्छा दिल्या. देशभावना जागृत करण्यासाठी आणि देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांचे मनोबल वाढवण्यासाठी अधिकाधिक तरुणांनी अशा मोहिमा राबवाव्यात, असे मत शंकर जगताप यांनी व्यक्त केले. देशभरात भारताच्या स्वातंत्र्यांचा अमृत महोत्सव साजरा होत आहे. त्यानिमित्त वाकडमधील पाच बाईक रायडर तरुणांनी एकत्र येत देशाची अविरत सेवा करणाऱ्या जवानांना अनोख्या पद्धतीने मानवंदना देण्याचा निर्णय घेतला. हे पाचही बाईक रायडर तरुण पुणे ते गुजरातमधील नारायण सरोवर पुढे अरूणाचल प्रदेशमधील काहो ते पुन्हा पुणे असा तब्बल ८ हजार ५०० किलोमीटरचा प्रवास करणार आहेत. या प्रवासाला त्यांनी आजपासून (शनिवार) सुरूवात केली आहे. वैभव रहाटे, राहुल मोकाशी, संदीप कटके, राहुल हंकारे, महेंद्र शेवाळे असे त्या पाच बाईक रायडर तरुणांची नावे आहेत.

# पुण्यात मार्केट यार्ड परिसरात गोळीबार!

## पी.एम. अंगडिया कार्यालयातील घटना , दिवसाढवळ्या 28 लाखांची लूट

। पुणे। महाईन्यूज।

पुण्यात मार्केट यार्ड परिसरात गोळीबार करण्यात आला आहे. गोळीबार करुन लुटल्याची धक्कादायक घटना घडली आहे. यावेळी गोळीबार करत २८ लाख रुपयांची रक्कम घेऊन आरोपी फरार झाले आहेत. ५ ते ६ आरोपी पी.एम. अंगडिया कार्यालयातून पसार झाले आहेत. पोलीस याप्रकरणी सध्या तपास करत आहेत. मात्र, भरदिवसा झालेल्या या गोळीबाराच्या घटनेने




**मार्केट यार्ड परिसरात पी.एम. अंगडिया यांचं कार्यालय आहे. ते कुरिअर कार्यालय असल्याची माहिती आहे. आज याठिकाणी ४ ते ५ जण आले त्यांनी गोळीबार केला आणि तब्बल २८ लाखांची रोकड पळवून नेली.**

पुण्यात दहशतीचं वातावरण आहे.

घटनेची माहिती मिळताच मार्केट यार्ड पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. मार्केट यार्ड परिसरात पी.एम. अंगडिया यांचं कार्यालय आहे. ते कुरिअर कार्यालय असल्याची माहिती आहे. आज याठिकाणी ४ ते ५ जण आले त्यांनी गोळीबार केला आणि तब्बल २८ लाखांची रोकड पळवून नेली.

तक्रारदार हे सकाळी ११ वाजताच्या दरम्यान त्यांच्या ऑफीसमध्ये आलेले होते. आल्यानंतर त्यांनी कॅश चेक केली. त्यानंतर पावणे १२ च्या सुमारास ५ आरोपी आले त्यांनी दारातून पिस्टल दाखवली. त्यानंतर दुसऱ्या साथीदाराने त्यांनी खोलीतून ढकलून बाहेर काढलं, मध्ये जी ग्लास होती ती गोळीबार करुन फोडली, त्यानंतर पाचही आरोपींनी आत येऊन रक्कम घेऊन गेले, अशी माहिती मार्केट यार्ड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक अनघा देशपांडे यांनी दिली. यामध्ये अद्याप कोणीही जखमी असल्याची माहिती नाही. सध्या सीसीटीव्ही फुटेज तपासलं जात आहे. या प्रकरणाचा तपास सुरु आहे, असंही त्यांनी सांगितलं.

---

### पोलाद व्यावसायिकाचे चौकशी प्रकरण

## आर्थिक गुन्हे शाखेतील पोलीस निरीक्षकाची नियंत्रण कक्षात बदली!

पुणे । महाईन्यूज ।

शहरातील एका पोलाद व्यावसायिकाच्या चौकशी प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखेतील वरिष्ठ पोलीस निरीक्षक वजीर शेख यांची नियंत्रण कक्षात बदली करण्याचे आदेश पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता यांनी दिले.पोलाद व्यावसायिकाच्या चौकशीबाबत प्रहार संघटनेचे प्रमुख आमदार बच्चू कडू यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र दिले होते.

चौकशीत काही संशयास्पद बाबी आढळून आल्याने तातडीने



बदलीची मागणी पत्राद्वारे करण्यात आली होती.

शहरातील एका पोलाद व्यावसायिकाची चौकशी सुरू आहे. या प्रकरणाची चौकशी आर्थिक गुन्हे शाखेतील वरिष्ठ पोलीस निरीक्षक वजीर शेख यांच्याकडे होती. या प्रकरणाची चौकशी प्रामाणिक अधिकाऱ्याकडून करण्यात यावी, अशी विनंती बच्चू कडू यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्राद्वारे केली होती. वजीर शेख यांच्याकडून तपास काढून घ्यावा, असे कडू यांनी पत्रात म्हटले होते. त्यानंतर मुख्यमंत्री शिंदे यांनी या प्रकरणात योग्य ती कारवाई करण्याचे आदेश पोलीस आयुक्तांना दिले. पोलीस आयुक्त गुप्ता यांनी वजीर शेख यांची पोलीस नियंत्रण कक्षात बदली करण्याचे आदेश दिले.

## दूध वाढीसाठी बेकायदा ऑक्सिटोसीन औषध विक्री करणाऱ्या टोळीच्या मुख्य सुत्रधाराला अटक

पुणे । महाईन्यूज ।

गाई, म्हशींचे दूध वाढविण्यासाठी बेकायदा ऑक्सिटोसीन औषधाची विक्री करणाऱ्या पश्चिम बंगालमधील टोळीच्या मुख्य सूत्रधारास गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने बेड्या ठोकल्या. पोलिसांच्या पथकाने ठाण्यातील मुंब्रा परिसरातून त्यास अटक केली.बाबूभाई उर्फ अल्लाउद्दीन लस्कर (रा. कल्याण, ठाणे) असे अटक केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. काही दिवसांपूर्वीच अमली पदार्थ विरोधी पथक, विमानतळ पोलिस व अन्न व औषध प्रशासन विभाग यांच्यावतीने लोहगाव येथील कलवड वस्ती परिसरामध्ये कारवाई करण्यात आली होती. त्यामध्ये गाई, म्हशींच्या दूधवाढीसाठी ऑक्सिटोसीन औषधाचा साठा करुन त्याचे वितरण करणाऱ्या पश्चिम बंगालमधील टोळीला पोलिसांनी पकडले होते. पोलिसांनी त्यांच्याकडून तब्बल 53 लाख 52 हजार रुपये इतका साठा जप्त केला होता.

दरम्यान, या प्रकरणात समीर अन्वर कुरेशी (वय 29, रा. कलवड वस्ती, लोहगाव), बिश्वजीत सुधांशु जाना (वय 44, रा. पुरबा बार, विलासपुर, पुरबा मदीनीनपुर, पश्चिम बंगाल), मंगल कनललाल गिरी (वय 27, तिराईपूर, पश्चिम बंगाल), सत्यजीत महेशचंद्र मोन्डल (वय 22, रा. नबासन कुस्तीया पंचायत, पश्चिम बंगाल), श्रीमंता मनोरंजन हल्दर (वय 32, रा. नलपुरकुर, मंडाल, पश्चिम बंगाल) यांना अटक केली होती.

दरम्यान, पोलिसांकडून या टोळीच्या मुख्य सुत्रधाराचा शोध घेतला जात होता. पोलिसांनी केलेल्या तांत्रिक तपासामध्ये मुंब्रा येथील बाबूभाई लस्कर हा या प्रकरणातील मुख्य सुत्रधार असल्याचे उघडकीस आले होते. आरोपींना पकडल्याची खबर मिळाल्यामुळे लस्कर हा पसार झाला होता.

दरम्यान, तो पुन्हा मुंब्रा येथे आला असल्याची खबर पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार, अमली पदार्थ विरोधी पथकाने त्यास मुंब्रा येथील अमृतनगर परिसरातुन अटक केली.


---

## भारताचा विश्वकल्याणाचा विचार जगाला देण्याची गरज; भगतसिंह कोश्यारी यांचे मत

पुणे । महाईन्यूज ।

**जीवनाच्या विविध क्षेत्रात एकरूपता आणून भारताचा विश्वकल्याणाचा शाश्वत विचार जगाला देण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे, असे मत राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी शुक्रवारी व्यक्त केले. भारतीय विचारांवर अतूट विश्वास असेल, तर आपल्याला कोणी आता थांबवू शकणार नाही, असेही ते म्हणाले.'सेंटर फॉर इंटिग्रल स्टडीज अँड रिसर्च संस्थे'तर्फे (सीआयएसआर) 'एकात्म मानव दर्शन-संकल्पना कोश' या ग्रंथाचे प्रकाशन भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी कोश्यारी बोलत होते.**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रय होसबळे, प्रज्ञाप्रवाहचे राष्ट्रीय प्रवर्तक नंदकुमार, कार्याध्यक्ष रवी देव, संपादक रवींद्र महाजन,



प्रशांत साठे या वेळी उपस्थित होते. कोश्यारी म्हणाले, पं. दीनदयाळ उपाध्याय यांनी एकात्म मानववाद या शब्दाचा उपयोग केला. समग्र जगाच्या कल्याणासाठी सर्व विचारांच्या साररूपाने हा विचार त्यांनी मांडला. भारताचा विश्वकल्याणाचा विचार शाश्वत आहे. त्यावर दृढ श्रद्धा ठेवून जगाला मानवकल्याणाचा संदेश प्रभावीपणे देत येईल. होसबळे म्हणाले, एकात्म मानववाद हा कोश आहे. ही कांदबरी नाही, शब्दकोश नाही आणि माहितीचा स्रोतही नाही. मात्र, त्या प्रत्येकाचा अंश यात आहे. या कोशासाठी अनेक संदर्भ तपासण्याचे आव्हान संपादक मंडळाने पेलले असून कोशाचा निश्चितच समाजाला उपयोग होईल. 'सीआयएसआर'च्या हरिभाऊ मिरासदार यांनी प्रास्ताविकात ग्रंथलेखनाच्या उद्देशाविषयी माहिती दिली.

सर्व विचारांच्या साररूपाने हा विचार त्यांनी मांडला. भारताचा विश्वकल्याणाचा विचार शाश्वत आहे. त्यावर दृढ श्रद्धा ठेवून जगाला मानवकल्याणाचा संदेश प्रभावीपणे देत येईल. होसबळे म्हणाले, एकात्म मानववाद हा कोश आहे. ही कांदबरी नाही, शब्दकोश नाही आणि माहितीचा स्रोतही नाही. मात्र, त्या प्रत्येकाचा अंश यात आहे. या कोशासाठी अनेक संदर्भ तपासण्याचे आव्हान संपादक मंडळाने पेलले असून कोशाचा निश्चितच समाजाला उपयोग होईल. 'सीआयएसआर'च्या हरिभाऊ मिरासदार यांनी प्रास्ताविकात ग्रंथलेखनाच्या उद्देशाविषयी माहिती दिली.

### हिंदू धर्म अन् छत्रपती संभाजी महाराजांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य

# काँग्रेसच्या बेताल नेत्याविरोधात भाजपाचे आंदोलन!

## शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांच्याकडून निषेध




**पिंपरी-चिंचवड ।। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**हिंदूधर्म आणि धर्मवीर छत्रपती संभजी महाराज यांच्याबाबत अवमानकारक वक्तव्य करणारे कर्नाटक काँग्रेसचे नेते सतीन जारकीवली याच्याविरोधात पिंपरी-चिंचवड भारतीय जनता पार्टीच्या वतीने निदर्शने करण्यात आली.**

कर्नाटक काँग्रेस प्रदेश समितीचे कार्याध्यक्ष सतीश जारकीवली यांनी हिंदू हा पर्शियन शब्द असून, त्याचा अर्थ अत्यंत घाण आहे. हिंदू हा शब्द आमच्यावर का थोपवला जातोय? असा प्रश्न उपस्थित करीत आक्षेपार्ह विधान केले होते. तसेच, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांना दिलेल्या “धर्मवीर” उपाधीचा व मराठ्यांचा अपमान करत धर्मवीर उपाधीसाठी मराठी लायक नाहीत, अशी मुक्ताफळे उधळली आहेत. त्यामुळे महाराष्ट्रासह तमाम हिंदू बांधव आणि शिव-शंभूप्रेमींमधून संताप व्यक्त होत आहे. दरम्यान, भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्वाखाली मोरवाडी येथील मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. काँग्रेसचा नेता जारकीवली याच्या प्रतिमेला जोडे मारण्यात आले.

यावेळी जिल्हा संघटन सरचिटणीस अमोल थोरात, जिल्हा सरचिटणीस राजू दुर्गे, मोरेश्वर शेडगे, विजय फुगे, राजेश पिल्ले, विलास मडेगिरी, संकेत चोंधे, गणेश यादव, प्रकाश जवळकर, देवदत्त लांडे, नाना डवरी, बापूसाहेब भोसले, कैलास सानप, किसन बावकर, अजय पाताडे, नंदू कदम, योगेश चिंचवडे, विजय शिनकर, प्रदीप बेंद्रे, दिपक नागरगोजे, कविता हिंगे, वैशाली खाडे, सौ कमलेश बरवाल, गणेश ढाकणे, मयुर काळभोर, दिनेश यादव, गणेश जवळकर, दीपक नागरगोजे,मुक्ता गोसावी, कोमल शिंदे, निखिल काळकुटे, प्रशांत बाराथे, विक्रांत गंगावणे, राजेश डोंगरे,शंकर लोंढे, मुकेश चुडासमा,बिभीषण चौधरी, डॉ हेमंत देवकुळे,सुरेश गादीया, नंदू कदम, संजय परळीकर आदी उपस्थित होते.



**“हिंदू धर्माबाबत आम्हाला अभिमान आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज ही आमची अस्मिता आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीद्वारे अशा बेजबाबदार आणि अवमानकारक व्यक्तव्याचा निषेध होत आहे. शिवप्रेमी तरुणांमध्ये संताप आहे. काँग्रेसच्या ‘त्या’ नेत्याचा आम्ही तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करतो.**

**- महेश लांडगे,**

भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार, भोसरी विधानसभा

---

### आता मोटार, TV, फ्रीजची होऊ शकते जप्ती!

# मालमत्ताकर थकबाकीदारांनो आता व्हा सावधान!

## PCMC : पालिकेची मिळकतकराची 583 कोटी रुपयांची थकबाकी

**पिंपरी-चिंचवड ।। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पालिकेची मिळकतकराची 583 कोटी रुपयांची थकबाकी आहे. त्यातील आठ हजार ७९१ जणांकडे एक लाखांपेक्षा अधिक रकमेची ती आहे. त्यांच्याकडे एकूण २१६ कोटी कर थकित आहेत. तो वसूल करण्यासाठी या एक लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकीदारांच्या मोटारी, टीव्ही, फ्रिजसारख्या लक्झरी वस्तू जप्त करण्याची कारवाई पुढील आठवड्यापासून पालिकेचा करसंकलन विभाग सुरु करणार आहे.**

पिंपरी-चिंचवड महापालिकेचे या आर्थिक वर्षात (२०२२-२३) एक हजार कोटी रुपयांचा मिळकतकर वसुलीचे लक्ष्य आहे. त्यासाठी पालिका प्रशासन पुढील आठवड्यापासून मोठ्या थकबाकीदारांचे टीव्ही, फ्रीज, मोटार जप्त करणार आहेत. महापालिकेच्या करसंकलन विभागाचे प्रमुख सहाय्यक आयुक्त निलेश देशमुख यांनी ही माहिती दिली.

त्यापूर्वी त्यांना नोटीस देऊन थकबाकी भरण्यासाठी एक आठवड्याची मुदत दिली जाणार आहे. त्या कालावधीत थकीत कर त्यांनी जमा केला नाही, त्यांच्या लक्झरी वस्तू जप्त केल्या जाणार आहेत. यापूर्वीही थकित मिळकतरधारकांच्या घरासमोर पालिकेने बँड वाजविण्याची मोहीम राबविली होती. दरम्यान, मिळकतकर वसुलीसाठी कार, फ्रीज, टीव्ही जप्त करण्याचा निर्णय त्वरित मागे घेण्याची मागणी स्थायी समितीच्या माजी अध्यक्षा सीमा सावळे यांनी पालिका आयुक्त तथा प्रशासक शेखरसिंह यांच्याकडे आज केली.

जनतेचा अपमान करणारा निर्णय हा निर्णय अत्यंत चुकीचा असून त्यामुळे शहराची प्रतिमा मलिन होऊ शकते.तसेच थकबाकीदारांची समाजात नाचक्की करून वसुली करणे ही आपली संस्कृती नाही,असे त्यांनी आयुक्तांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

कायदा सुव्यवस्थेचा प्रश्नही निर्माण होऊ शकतो,अशी भीती त्यांनी व्यक्त केली आहे.मिळकतकर वसुलीसाठी सनदशीर मार्ग अवलंबावा,असा सल्ला त्यांनी दिला आहे.



### हा निर्णय जनतेचा अपमान करणारा

गेल्या दोन -अडीच वर्षांत कोरोनाने हजारोंच्या नोकऱ्या गेल्या. धंदे बंद पडले. अनेकांना बँकांचे हप्ते थकल्याने सर्वस्व गमवावे लागले. अनेक घरांतून कमावणारे दिवंगत झाले. हाताला काम नसल्याने समाजात प्रचंड असंतोष खदखदतो आहे. या परिस्थितीवर मात करून शहरातील उद्योग व्यवसाय चालक आता कुठे उभारी घेत आहेत. अशात मिळकत वसुलीसाठी आहे, असे सीमा सावळे यांचे म्हणणे आहे.

## संपादकीय »

# माफक अपेक्षा!

***पर्यावरण रक्षण ही सलग आणि सतत सुरू असणारी प्रक्रिया असते आणि ती तशीच असायला हवी. त्यामुळे एका परिषदेत पर्यावरण रक्षणासाठी काय झाले, असे विचारणे अयोग्य ठरते.***

असे असले तरीही हा प्रश्न विचारावा लागतो कारण पर्यावरण रक्षणात कालच्या तुलनेत आज गुंजभर का असेना प्रगती होत नसेल तर ती अधोगतीच ठरते. म्हणून इजिप्तमधील शर्म-अल-शेख येथे भरलेल्या ‘सीओपी २७’ (कॉन्फरन्स ऑफ पार्टीज) या संयुक्त राष्ट्र संघटनेच्या वातावरणीय बदल परिषदेच्या वार्षिक अधिवेशनाचा आढावा घेणे आवश्यक ठरते. याआधीची ‘सीओपी २६’ परिषद ब्रिटनमधील ग्लासगो शहरात भरली होती. गेल्या वर्षी भरलेल्या या परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भारतास २०७० पर्यंत कर्बउत्सर्जनाबाबत ‘नेट झिरो’ करण्याच्या घोषणेखेरीजही बरेच काही महत्त्वाचे घडले. त्यानंतर वर्षभरात जवळपास संपूर्ण विश्वाने पर्यावरणीय बदलाचे कमीअधिक फटके खाल्ले. कोठे न थांबणारा पाऊस तर कोठे पावसाचा मागमूसही नाही. वातावरणातील या बदलांनी सगळ्यांच्याच मनात धास्ती निर्माण झालेली असताना इजिप्तमधील शर्म-अल-शेख या पर्यटनस्थळी भरलेल्या ‘सीओपी २७’ परिषदेकडून अधिक काही भरीव निर्णयाची अपेक्षा असणे साहजिक. ही परिषद संपण्यास अद्याप काही अवधी आहे. त्यामुळे अपेक्षाभंगाचा सूर तूर्तास लावणे अन्यायकारक ठरावे. तथापि ही परिषदेतील चर्चेची तबकडी नुकसानभरपाई या मुद्द्यावर सध्या अडकलेली दिसते. त्यामुळे परिषदेच्या परिपूर्तीसाठी वाट न पाहता या मुद्द्यावर चर्चा होणे गरजेचे आहे. याचे कारण हा मुद्दा आपणासही लागू होतो. तो आहे पर्यावरण ऱ्हासासाठी जबाबदार असणाऱ्यांनी अन्यांस नुकसानभरपाई देण्याबाबत. म्हणजे विकसित देशांनी विकसनशील देशांस काही एक रक्कम उचलून देण्याबाबतची ही चर्चा. गेल्या काही चर्चा-फेऱ्यांत प्रगत, विकसित देशांनी ही अशी नुकसानभरपाई द्यायला हवी हा मुद्दा तसा सर्वास स्वीकारार्ह ठरलेला आहे. म्हणजे त्याबाबत वाद नाही. परंतु जी बाब वरवर, सर्वानुमते मान्य होते ती तपशिलाच्या खाचाखोचांत अडकू शकते. नुकसानभरपाईचे हे असे झाले आहे. म्हणजे असे की यातील प्रगत, पाश्चात्त्य विकसित देश कोणते याबाबत दुमत नाही. अमेरिका, ब्रिटन तसेच युरोपातील अन्य काही देश आदींनी अन्य गरीब देशांस कर्बउत्सर्जनावर नियंत्रण आणण्यासाठी मदत करायला हवी हे सर्वानाच मान्य. पण तपशील ठरवताना कोणी कोणास काय म्हणावे हा मुद्दा अडथळ्याचा ठरताना दिसतो. उदाहरणार्थ जगातील दुसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असलेल्या चीन या महाकाय देशाचा समावेश कोणत्या गटात व्हायला हवा? अथवा नुकतेच इंग्लिश अर्थव्यवस्थेला ज्या देशाने मागे टाकले त्या भारतास विकासाच्या कोणत्या टप्प्यावर मोजायचे?

# मेट्रो बिट्रो ठीक आहे; पण...






औरंगाबाद शहराची नोंद आशिया खंडात सर्वांत वेगाने वाढणारे शहर अशी एके काळी झाली होती. आताही हा विक्रम औरंगाबादच्याच नावावर आहे, असे मानले जाते. येत्या काळात शहराचा वाढीचा, विस्ताराचा आणि विकासाचा वेग तसाच राहिला पाहिजे, असे वाटत असेल, तर राज्यकर्त्यांनी आणि त्यांना प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे सहकार्य करणाऱ्या राजकारण्यांनी येत्या काही वर्षांसाठी स्वत:ला आचारसंहिता घालून घेणे गरजेचे आहे.

राज्याचे माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी जायकवाडी धरणाच्या माध्यमातून औरंगाबादकरांना आणि संपूर्ण मराठवाड्याला मोठी देण दिली आहे. जायकवाडी धरणामुळेच औरंगाबादचा लौकिक आशिया खंडात सर्वांत वेगाने वाढणारे शहर असा झाला आहे, हे कुणालाही नाकारता येणार नाही. जायकवाडी धरणामुळे औरंगाबाद पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाले. त्यामुळे औरंगाबादचा औद्योगिक विकास होऊ शकला आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. ‘बजाज ऑटो’सारख्या कंपनीने त्याचा पाया रचला. जायकवाडी धरणामुळे औरंगाबादचे ‘पाणी’ सिद्ध झाले. आता पाण्याची ‘टंचाई’ गेल्या काही दशकांपासून निर्माण झाली आहे. त्यामुळे उद्योगांनी पाठ फिरवली आहे. पंचतारांकित औद्योगिक वसाहत होऊनदेखील या वसाहतीत बडे उद्योग आणण्यात राज्यकर्त्यांना म्हणावे तसे यश आले नाही. पाण्याच्या प्रश्नामुळे शहराचा विकास खुंटला. शहराच्या विकासाचा जो काही परिघ पूर्वी निश्चित झाला होता, तोच आजदेखील कायम आहे. त्यात वाढ होणे अपेक्षित होते. पण तसे झाले नाही.

‘जल है तो जीवन है’ असे म्हटले जाते. ‘जल है तो विकास है’ असेही आता म्हणावे लागेल; परंतु याकडे सोईस्कर दुर्लक्ष करण्यात आले. औरंगाबाद शहराचा पाणी प्रश्न सोडवण्यासाठी २००६मध्ये समांतर जलवाहिनीच्या कामाचा मुहूर्त केला गेला; पण मूठभर लोकांच्या ‘मी’पणामुळे हा प्रकल्प रखडला, जनतेला जाचक ठरू शकणाऱ्या अटी बदलण्याचा मोठेपणा त्या मूठभर लोकांनी दाखवला असता, तर पाच-सात वर्षांपूर्वीच औरंगाबादकरांचा पाणीप्रश्न सुटला असता; पण तसे झाले नाही. शेवटी २०१६मध्ये समांतर जलवाहिनीच्या प्रकल्पाला मूठमाती दिली गेली.

त्यानंतर नवीन पाणीपुरवठा योजनेची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. समांतर जलवाहिनी योजनेला मूठमाती मिळाली, तेव्हा ती योजना सुमारे ८०० कोटी रुपयांची होती. आता नवीन पाणीपुरवठा योजना सुरुवातीला १,६८० कोटींची होती, आता ती २,७१४ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. योजनेचे काम पूर्ण होईपर्यंत ती तीन हजार कोटींच्या पार गेल्यास आश्चर्य वाटू नये. या योजनेच्या कंत्राटदाराला २० महिन्यांपूर्वी (४ फेब्रुवारी २०२१) वर्कऑर्डर देण्यात आली. २० महिन्यांत केवळ पाच ते सात टक्के काम होऊ शकले आहे. निविदेतील अटीनुसार कंत्राटदाराला ३६ महिन्यांत योजनेचे काम पूर्ण करायचे आहे. म्हणजे उरलेल्या १६ महिन्यांत ९३-९५ टक्के काम करावे लागणार आहे. हे कसे शक्य होईल, याकडे राज्यकर्त्यांनी लक्ष दिले पाहिजे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या योजनेच्या कामात लक्ष घातले होते; पण करोनाकाळामुळे त्याला मर्यादा आल्या. आता केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी यात लक्ष घातले आहे. त्यांनी आढावा बैठकादेखील घेतल्या आहेत. दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आढावा बैठक घेण्याची घोषणाही त्यांनी केली आहे. ही घोषणा करतानाच त्यांनी मेट्रो रेल्वेचा प्रकल्प आणि वाळुज औद्योगिक वसाहत आणि शेंद्रा औद्योगिक वसाहत यांना जोडणारा सुमारे २८ किलोमीटर लांबीचा अखंड उड्डाणपूल उभारण्याच्या कामातसुद्धा लक्ष घातले आहे. या दोन्ही प्रकल्पांच्या अनुषंगाने प्राथमिक स्तरावरील सादरीकरण नुकतेच झाले. आता अंतिम सादरीकरण केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि हरदीपसिंह पुरी यांच्यासमोर केले जाणार आहे.

# ऊस दराचे नवे सूत्र कोणाच्या फायद्यासाठी?

**प्रस्तुत लेखक आपल्या मूळ गावी अंशतः स्थायिक असून व्यावसायिक पद्धतीने वडिलोपार्जित शेतीचे व्यवस्थापन पाहणारा ऊस उत्पादक शेतकरीसुद्धा आहे**

ऊस हे दीर्घ कालावधीचे (साधारण वर्षभराचे) पीक असले तरी, ‘हमखास’ आणि ‘खात्रीशीर’रीत्या एकरकमी ठरावीक रक्कम ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होण्याची हमी असल्याने, आज राज्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यालासुद्धा आपल्या शेतात ऊस असावा असे वाटते. राज्यातील शेतकऱ्यांना आर्थिक स्थिरता आणि बऱ्याच अंशी संपन्नता मिळवून देण्याचे काम ऊस या नगदी पिकाने केले आहे, यात वादच नाही.इतर धान्य (भरड-तृणधान्य), डाळी, तेलबिया, फळफळावळ, फळभाज्या-पालेभाज्या (तरकारी) यांचा ‘प्रतवारीनुसार लिलाव’ होतो. ‘हमीभाव’ असला तरी ‘मागणी आणि पुरवठा’ यावर त्यांचा बाजारभाव ठरतो अन् त्यानुसार संबंधित शेतकऱ्याला रक्कम मिळते. ऊस उत्पादक शेतकऱ्याला ‘आधार’ असतो, एफआरपीचा!

ऊस दराबाबत नेहमी वापरला जाणारा शब्द- एफआरपी. ‘फेअर अँण्ड रेम्युनरेटिव्ह प्राइस’चे हे संक्षिप्त रूप. याला मराठीत ‘रास्त आणि किफायतशीर दर’ म्हटले जाते. सोप्या



शब्दांत सांगायचे तर, एफआरपी म्हणजे साखर कारखान्यांनी उसाला दिलेला प्रति टन दर.

उसाचा एकूण उत्पादन खर्च आणि त्यावरील साधारण १५ टक्के नफा गृहीत धरून एफआरपी ठरवला जातो. साखरेच्या हंगामाचा ‘रास्त आणि किफायतशीर भाव’ (एफआरपी) निश्चित करण्याचा अधिकार केंद्र सरकारला आहे. केंद्र सरकारच्या कृषी आयोगाकडून हा दर ठरवला जातो. कायद्यानुसार साखर कारखाने ‘एफआरपी’पेक्षा कमी दर ऊस उत्पादक शेतकऱ्यांना देऊ शकत नाहीत.

‘एफआरपी’मुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादन खर्चापेक्षा ५० टक्के जास्त परतावा मिळणे अपेक्षित असते. एक टन उसापासून ९० किलो साखर (साधारणतः ९ टक्के) तयार होईल, असे गृहीत धरले जाते. ९ टक्के ‘साखर उतारा’ हा पायाभूत समजला जातो. त्या आधारे प्रति टन उसाची किंमत काढली जाते. प्रत्येक साखर कारखान्याचा ‘साखर उतारा’ हा वेगळा असतो. केंद्र सरकारने गाळप हंगाम २०२२-२०२३ वर्षासाठी १०.२५ टक्के साखर उताऱ्यावर प्रति क्विंटल ३०५ रुपये ऊस दर निश्चित केला आहे (३०५० रुपये प्रति टन ऊस दर (एफआरपी)). गेल्या वर्षभरात शेतीच्या मशागतीची साधन-सामग्री-मजुरी, त्याचबरोबर खते, तणनाशक, कीटकनाशके यामध्ये २५ टक्क्यांपेक्षा अधिक दरवाढ झाली. त्या प्रमाणात ऊस दरात २.४ टक्के वाढ केली.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांना किमान ४५०० रुपये प्रति टन ऊस दर १० टक्के साखर उताऱ्यावर द्यावा, ही मागणी स्वामिनाथन आयोगाचे सदस्य राहिलेले अतुलकुमार अंजान करत आहेत. केंद्र सरकारने उसाची एफआरपी जाहीर करताना, स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशींतील तरतुदीनुसार ‘सी २ ५० टक्के’ हे सूत्र वापरण्याऐवजी ‘ए २ एफ एल’ या सूत्राचा आधार घेतला आहे

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।  
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥  
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।  
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥  
**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### 'बी फॉर बारामती'साठी सीतारामन पुन्हा बारामतीच्या मैदानात

। बारामती । महाईन्यूज ।

भारतीय जनता पक्षाच्या 'बी फॉर बारामती' मोहिमेअंतर्गत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन पुन्हा बारामतीच्या मैदानात उतरणार आहेत. दोन महिन्यांतील त्यांचा हा दुसरा दौरा भाजप पदाधिकाऱ्यांनी गांभीर्याने घेतला आहे. त्यामुळे बारामतीचा बालेकिल्ला आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांना घेरण्यासाठी आक्रमक रणनीती आखण्यास सुरुवात झाली आहे. बारामती लोकसभा मतदार संघ भाजपने गांभीर्याने घेतल्याचे संकेत यातून मिळत आहेत. लोकसभा निवडणुकीला दोन वर्षांचा कालावधी बाकी आहे. त्या दृष्टीने भाजपने गेल्या सहा महिन्यांपासून राज्यातील सोळा लोकसभा मतदार संघांवर लक्ष केंद्रित केले आहे.

# कृषीपंपाचा वापर वाढल्याने राज्यातील विजेची मागणी 23 हजार मेगावॅटवर!

## वीजनिर्मिती प्रकल्पांत 15 हजार 616 मेगावॅटची निर्मिती

। नागपूर। महाईन्यूज ।

राज्यात सातत्याने पडणारा पाऊस व तापमान कमी झाल्यामुळे ऐन दिवाळीत २६ ऑक्टोबरला विजेची मागणी १८ हजारांहून कमी म्हणजे १७ हजार ६२३ मेगावॅट होती. परंतु, आता पाऊस थांबल्याने व कृषीपंपाचा वापर वाढल्याने ही मागणी २३ हजार मेगावॅटवर पोहचली आहे. 'स्टेट लोड डिस्पॅच सेंटर'नुसार, ११ नोव्हेंबर रोजी दुपारी २.१० च्या सुमारास राज्यात विजेची मागणी २३ हजार ३७ मेगावॅट होती. त्यापैकी शासकीय व खासगी वीजनिर्मिती प्रकल्पांत १५ हजार ६१६ मेगावॅटची निर्मिती होत होती.



केंद्राच्या वाट्यातून राज्याला ७ हजार १४३ मेगावॅट वीज मिळत होती तर राज्यात सर्वाधिक ६ हजार ३२ मेगावॅट वीज महानिर्मितीच्या कोळसा, जलविद्युत, गॅस, सौरऊर्जा प्रकल्पातून मिळत होती. त्यात सर्वाधिक ५ हजार २६३ मेगावॅट वीज महानिर्मितीच्या औष्णिक विद्युत केंद्रातील होती. दरम्यान, खासगी वीजनिर्मिती प्रकल्पातून ८ हजार ४०३ मेगावॅटची निर्मिती होत होती. त्यात अदानी प्रकल्पातील २ हजार ३८४ मेगावॅट, आयडियल १८९ मेगावॅट, जिंदल ४४५ मेगावॅट, रतन इंडिया १ हजार ७२ मेगावॅटसह इतरही प्रकल्पातील वीजनिर्मितीचा समावेश होता. सहसा ऑक्टोबर महिन्यात राज्यात विजेची मागणी चांगलीच वाढते. परंतु यंदा या महिन्यापर्यंत सातत्याने पाऊस पडला. त्यामुळे कृषीपंपाचा वीज वापर खूपच कमी झाला होता. परंतु ऑक्टोबरच्या शेवटी पावसाने उसंती घेतली. त्यामुळे नोव्हेंबरमध्ये कृषीपंपांचा वीज वापर वाढू लागला आहे. बऱ्याच भागात थंडी वाढल्याने नागरिकांकडून हिटरचा वापर वाढतोय काही भागात उद्योगांमध्येही विजेची वाढीव मागणी नोंदवली जात आहे. त्यामुळे ही मागणी अचानक १७ दिवसांमध्ये सुमारे ५ हजार मेगावॅटहून जास्त वाढलेली दिसत आहे. दिवाळीचा काळ असलेल्या २६ ऑक्टोबरला राज्यात विजेची मागणी १७ हजार ६२३ मेगावॅट होती.

# लाचखोर तहसिलदारांना पोलीस कोठडी

। मुंबई । महाईन्यूज ।

अलिबागच्या लाचखोर तहसिलदार मिनल दळवी आणि त्यांचा हस्तक राकेश चव्हाण याला विशेष सत्र न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. कोळगाव येथील बक्षीसपत्राने दिलेल्या जमिनीच्या सातबाऱ्यावर नाव चढविण्यासाठी दोन लाखांची लाच घेतल्या प्रकरणी त्यांना अटक करण्यात आली आहे. नवी मुंबईच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शुक्रवारी संध्याकाळी ही कारवाई केली होती. रात्री उशीरा या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. आज सकाळी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दळवी यांना अटकेची



कारवाई केली. यानंतर दुपारी एकच्या सुमारास त्यांना अलिबाग येथील विशेष सत्र न्यायाधीश अशोककुमार भिल्लारे यांच्या न्यायालयासमोर हजर करण्यात आले.

यावेळी शासकीय अभिव्योक्ता म्हणून अँड भुषण साळवी यांनी तर आरोपींच्या वतीने अँड प्रविण ठाकूर यांनी काम पाहिले. दोन्ही बाजूचे युक्तीवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने दोन्ही आरोपींना दोन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

### घरझडतीत सापडले साठ तोळे सोनं...

**लाचखोरीच्या प्रकरणात अटक केल्यानंतर तहसिलदार मिनल दळवी यांच्या घराची झडती घेण्यात आली. यावेळी दळवी यांच्याकडे ६० तोळे सोने आणि १८ हजार रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. त्यांच्या मुंबई येथील घराची झडती घेण्यासाठी एक पथक रवाना झाले आहे. घरझडती** सुरु आहे.

# विवियाना मॉलमधील मारहाण प्रकरणी जितेंद्र आव्हाड यांना जामीन मंजूर

।मुंबई । महाईन्यूज ।



ठाण्यातल्या विवियाना मॉलमध्ये केलेली मारहाण राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाडांना चांगलीत भोवली. काल आव्हाडांना वर्तक पोलिसांकडून अटक करण्यात आली होती. त्यानंतर आज त्यांना 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली होती. यानंतर त्यांच्या वकिलांनी जामिनासाठी अर्ज करण्यात आला होता. या प्रकरणी राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड यांना जामीन मंजूर झाला आहे.

आज सकाळी दोन्ही बाजूंच्या युक्तिवादानंतर न्यायालयाने जितेंद्र आव्हाड यांना 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली होती. जितेंद्र आव्हाड यांच्यासह 12 जणांना जामीन मंजूर करण्यात आला आहे. मॉलप्रकरणात जितेंद्र आव्हाड यांना अटक करण्यात आली होती. याच प्रकरणात आता त्यांना 15 हजाराच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर करण्यात आला आहे. मॉलमध्ये राडा झाल्यानंतर काल त्यांना वर्तक पोलिसांकडून अटक करण्यात आली होती. त्यानंतर आज त्यांना 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली होती. त्यानंतर आव्हाड यांच्या वकिलांनी पुन्हा एकदा जामीनाचा अर्ज केला होता.

दोन्ही बाजूंच्या युक्तिवादानंतर न्यायालयाने जितेंद्र आव्हाड यांना 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली होती. जितेंद्र आव्हाड यांच्यासह 12 जणांना जामीन मंजूर करण्यात आला आहे. मॉलप्रकरणात जितेंद्र आव्हाड यांना अटक करण्यात आली होती. याच प्रकरणात आता त्यांना 15 हजाराच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर करण्यात आला आहे.

# यंत्रमाग कारखान्याला भीषण आग!

## नियंत्रणाचे प्रयत्न युद्धपातळीवर सुरू

। हिंगोली । महाईन्यूज ।

सोलापुरातील यंत्रमाग कारखान्याला भीषण आग लागल्याचे वृत्त समोर आले आहे. सध्या आगीवर नियंत्रणात आणण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी सहा अग्निशमन दलाच्या गाड्या दाखल झाल्या असून, आगीवर नियंत्रण मिळवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. ही आग नेमकी कशी लागली याचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही. तसेच कारखान्यात कुणी अडकले आहे का? याबाबतही ठोस माहिती समोर आलेली नाही.



मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार सोलापुरातील निलमनगर भागात असलेल्या एका यंत्रमाग कारखान्याला ही भीषण आगा लागली आहे. संध्याकाळी साडेसहाच्या सुमारास ही आग लागल्याचे सांगितले जात आहे. ज्या ठिकाणी आग लागली आहे तो सोलापुरातील औद्योगिक वसाहत असलेला भाग आहे. या ठिकाणी अनेक मोठे कारखाने असून, संध्याकाळच्या सुमारास अचानक येथील एका यंत्रमाग कारखान्याला भीषण आग लागली. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार सोलापुरातील निलमनगर भागात असलेल्या एका यंत्रमाग कारखान्याला ही भीषण आगा लागली आहे. संध्याकाळी साडेसहाच्या सुमारास ही आग लागल्याचे सांगितले जात आहे. ज्या ठिकाणी आग लागली आहे तो सोलापुरातील औद्योगिक वसाहत असलेला भाग आहे.

या ठिकाणी अनेक मोठे कारखाने असून, संध्याकाळच्या सुमारास अचानक येथील एका यंत्रमाग कारखान्याला भीषण आग लागली.

दरम्यान, कामाची वेळ संपल्यामुळे अनेक कामगार कारखान्यातून बाहेर पडले होते. त्यामुळे मोठी जिवितहानी टळली आहे. मात्र, आगीमुळे कारखान्यातील कच्चामाल आणि मशिनरी आगीत जळून खाक झाल्या आहेत. त्यामुळे मोठे आर्थिक नुकसान झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# दिल्ली-एनसीआरसह उत्तर भारतात पुन्हा भूकंपाचे धक्के!

## नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण



### नागरिकांच्या प्रतिकिया...

नोएडामध्ये काम करणाऱ्या आकाश आणि विजय यांनी सांगितले की, मी ऑफिसमध्ये होतो तेव्हा माझी सीट हलू लागली. ऑफिसमध्ये भूकंपाचा अलार्म वाजला आणि त्यानंतर आम्ही तिथून बाहेर आलो. साधारण 10 मिनिटांनी आम्ही परत आत गेलो.

### नेपाळमधील डोटी जिल्ह्यात 6 जणांचा मृत्यू

नेपाळमधील डोटी जिल्ह्यात भूकंपानंतर पहाटे 2:12 च्या सुमारास घर कोसळून 6 जणांचा मृत्यू झाला. अनेक भागात एकापाठोपाठ तीन भूकंपाचे धक्के जाणवले. दुपारी 3.15 वाजता पुन्हा 3.6 रिश्टर स्केलच्या भूकंपाचे धक्के जाणवले.

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

दिल्ली-एनसीआरसह उत्तर भारतात पुन्हा एकदा भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. येथील नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. या भूकंपाचा केंद्रबिंदू अरुणाचल प्रदेशातील पश्चिम सियांग येथे होता. नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजीनुसार, अरुणाचलमधील या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर 5.7 एवढी होती. आज सकाळी 10.31 वाजता भूकंपाचे धक्के जाणवले. याआधी 9 नोव्हेंबरच्या रात्री दिल्ली-एनसीआरसह संपूर्ण उत्तर भारतात भूकंपाचे धक्के जाणवले होते. दिल्ली-एनसीआर, यूपी आणि बिहारमध्ये हे धक्के जाणवले. लखनौ, मुरादाबाद, मेरठ, बरेली आदी शहरांमध्येही भूकंपाचे धक्के जाणवले. त्याचवेळी एनसीआरच्या फरिदाबाद, गुरुग्राम, ग्रेटर नोएडा येथेही भूकंपाचे धक्के जाणवले. मात्र, या ठिकाणांवरून एकही अपघात झाला नाही, ही दिलासादायक बाब आहे.

## “राहुल गांधी आणि आदित्य ठाकरेंमध्ये देशाचं नेतृत्व करण्याची क्षमता”

### संजय राऊतांचे विधान

। नवी दिल्ली। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी माजी मंत्री आदित्य ठाकरे आणि खासदार राहुल गांधी यांच्यावर भाष्य केलं आहे. या दोन तरुण नेत्यांमध्ये देशाचं नेतृत्व करण्याची क्षमता आहे, असे राऊत यांनी म्हटले आहे. हे दोन तरुण नेते देशात ऊर्जा निर्माण करतील, असेही राऊत म्हणाले आहेत. राहुल गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसची ‘भारत जोडो’ यात्रा कन्याकुमारीतून मार्गक्रमण करत शुक्रवारी हिंगोलीत दाखल झाली होती. या यात्रेत आदित्य ठाकरे सहभागी झाले होते. यावेळी दोन तरुण नेत्यांनी गळाभेट घेतली. दरम्यान, भारत जोडो यात्रेत सहभागी झाल्यानंतर आदित्य ठाकरेंनी मोदी सरकारवर हल्लाबोल केला आहे. “देशात संविधान आणि लोकशाही चिरडली जात आहे. ते वाचवण्यासाठी आम्ही एकत्र आलो आहोत”, असे विधान त्यांनी काँग्रेसच्या यात्रेदरम्यान केले आहे.

“लोकशाहीसाठी दोन वेगवेगळे पक्ष एकत्र आले त्यात चुकीचे काय?” असा सवाल त्यांनी विचारला आहे. “आम्ही सगळे लंबी रेस के घोडे आहोत. जोपर्यंत कारवा सुरू आहे तोपर्यंत आम्ही चालत राहू”, असा निर्धार आदित्य ठाकरेंनी व्यक्त केला आहे.



## स्टार प्रचारक ठरले! गुजरातमध्ये महाराष्ट्रातील नेते गाजवणार निवडणुकीचं मैदान!

। नवी दिल्ली। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

गुजरातमध्ये पुढील महिन्यात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री अमित शहा, राजनाथ सिंह, नितीन गडकरी यांचे नाव आहे. भाजपचे अध्यक्ष जेपी नड्डा हे देखील भाजपचे स्टार प्रचारक असतील. या यादीत 40 स्टार प्रचारकांचा समावेश करण्यात आला आहे.

गुजरात भाजपचे प्रमुख सीआर पाटील, मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल आणि केंद्रीय मंत्री अर्जुन मुंडा आणि स्मृती इराणी यांचा स्टार प्रचारकांच्या यादीत समावेश करण्यात आला आहे. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, मध्य प्रदेशचे शिवराज सिंह चौहान, आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे स्टार प्रचारक असतील. स्टार प्रचारकांच्या यादीत गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी आणि माजी उपमुख्यमंत्री



नितीन पटेल यांच्या नावांचाही समावेश आहे. दोघांनीही निवडणूक लढवण्यास नकार दिला होता. भोजपुरी गायक आणि पक्षाचे खासदार मनोज तिवारी, रवी किशन आणि दिनेश लाल यादव 'निरहुआ' यांना स्टार प्रचारक बनवण्यात आले आहे. 182 सदस्यांच्या गुजरात विधानसभेच्या दोन टप्प्यातील निवडणुकीसाठी भाजपने गुरुवारी 160 उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. पक्षाने असा दावा केला आहे की रुपाणी आणि पटेल यांच्यासह अनेक वरिष्ठ नेत्यांनी निवडणुकीत लढण्यास नकार दिला आहे आणि यासंदर्भात केंद्रीय नेतृत्वाला पत्र लिहिले आहे. गुजरातमध्ये 1 आणि 5 डिसेंबरला दोन टप्प्यात मतदान होणार असून 8 डिसेंबरला मतमोजणी होणार आहे.

## हिमाचल प्रदेशात मतदानाला सुरुवात

### भाजपासाठी सत्ता राखण्याचं आव्हान, तर काँग्रेससाठी अस्तित्वाची लढाई

। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।




हिमाचल प्रदेश विधानसभा निवडणुकीसाठी आज मतदानाला सुरुवात झाली आहे. विधानसभेच्या ६८ जागांसाठी ४१२ उमेदवार रिंगणात आहेत. त्यांच्या भवितव्यासाठी आज राज्यातील ५५ लाख मतदार आपला हक्क बजावतील. या निवडणुकीत मुख्यमंत्री जयराम ठाकुर, माजी मुख्यमंत्री विरभद्र सिंहांचे पुत्र विक्रमादित्य सिंह यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. हिमाचल प्रदेशातील नागरिक भाजपाला पुन्हा संधी देतील, की विरोधी पक्ष काँग्रेससाठी सत्तेचा मार्ग मोकळा करतील, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. हिमाचल प्रदेशच्या निवडणुकीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी झंझावाती प्रचार केला होता. “उमेदवार बघू नका, कमळाला मत म्हणजेच मला मत”, असं म्हणत भाजपाला मतदान करण्याचं आवाहन मोदींनी नागरिकांना केलं होतं.

हिमाचल प्रदेशातील निवडणूक काँग्रेससाठी अस्तित्वाची लढाई आहे. गेल्या दोन विधानसभा निवडणुकांमध्ये काँग्रेसला पराभवाचा सामना करावा लागला होता. हा पराभव यावेळी विजयात बदलण्याचं आव्हान काँग्रेसपुढे आहे. या निवडणुकीसाठी राज्यभरात सात हजार ८०० मतदान केंद्र उभारण्यात आली आहेत.

“आम्हाला आशा आहे की लोक आणखी एक संधी देतील. सत्ताधारी सरकारला पुन्हा निवडून न देण्याची परंपरा मोडीत काढा, असे आवाहन आम्ही नागरिकांना केले आहे,” अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री जयराम ठाकुर यांनी ‘एनडीटीव्ही’ या वाहिनीशी बोलताना दिली. या निवडणुकीत जवळपास १ लाख २१ हजारांवर मतदार ८० वर्षांपेक्षा जास्त वयाचे आहेत. या निवडणुकीत २४ महिला उमेदवार आपलं नशीब आजमावत आहेत.

# आतुरता शिगेला! सुंदराबाईंचे दिवस भरले! स्वामींना राग अनावर..




सध्या पौराणिक मालिकांचे सत्र जोरदार सुरू आहे. प्रत्येक वाहिनीवर किमान एक तरी पौराणिक चारित्रावर आधारित मालिका सुरू आहे. यामध्ये सर्वाधिक चर्चेत असलेली मालिका म्हणजे कलर्स मराठी वरील 'जय जय स्वामी समर्थ'.. या मालिकेतून अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराजांची चरित्रगाथा सांगण्यात आली आहे. ही मालिका सध्या चाहत्यांच्या प्रचंड पसंतीस उतरली असून एक रंजक आणि महत्वाचा टप्पा जवळ आला आहे.स्वामींच्या चारित्रातील एक महत्वाचा भाग म्हणजे 'सुंदराबाई काडगावकर'. सुंदरा बाईनी बरीच वर्षे स्वामी सेवा केली. एक विधवा आणि गांजलेली श्री म्हणून स्वामींनी सुंदराबाईंना आधार दिला खरा परंतु त्याच सुंदराबाई नंतर अहंकार आणि लोभाच्या आहारी गेल्या. स्वामींच्या मठात लाच घेणे, पैसे लुटणे, चोरी करणे. भक्तांना त्रास देने असे अनेक उद्योग त्यांनी केले. आजवर आपण मालिकेतून ते पाहिलेच. पान स्वामी सुंदराबाईंना शिक्षा कधी करणार याकडे प्रेक्षकांचे लक्ष लागले होते. अखेर तो क्षण जवळ आला आहे.

सध्या मालिकेत दाखवले जात आहे की, सुंदरा बाईंची सर्व कारस्थानांना बाळप्पा स्वामी, भुजंग, चोळप्पा आणि सर्वच भक्त वैतागलेले आहेत. ही सर्व स्वामींना ठाऊक असतानाही स्वामी त्यांना का माफ करत आहेत, त्यांना शिक्षा का नाही असा प्रश्न सर्वांना पडला आहे. त्यावर स्वामी म्हणतातही की तिचं पूर्व कर्म चांगलं असल्याने दुर्लक्ष करावं लागतं. पण तिच्या पाप कर्मांचा घडा आता भरला आहे. तो घडा भरेल त्या दिवशी तिला शिक्षा होईल असे संकेत स्वामींनी दिले होते. आणि आता लवकरच सुंदराबाईंना स्वामींच्या क्रोधाला सामोरे जावे लागणार आहे.

# आयुष्य बेरंग...” घटस्फोटाच्या चर्चांदरम्यान मानसी नाईक

मराठी अभिनेत्री मानसी नाईक मागच्या काही दिवसांपासून सातत्याने चर्चेत आहे. मानसी नाईकने काही दिवसांपूर्वीच एक पोस्ट शेअर केली होती ज्यामुळे तिच्या वैवाहिक आयुष्यात वादळ आल्याचं बोललं जात आहे. मानसी नाईकचं मागच्याच वर्षी प्रदिप खरेराशी लग्न झालं होतं. पण काही दिवसांपूर्वीच तिने ‘वाईट बातमी- कोणतीही गोष्ट शेवटपर्यंत टिकत नाही, चांगली बातमी- कोणतीही गोष्ट शेवटपर्यंत टिकत नाही’ अशा आशयाची पोस्ट केली होती. त्यानंतर आता मानसी नाईकची आणखी एक पोस्ट चर्चेत आली आहे. मानसी नाईक सोशल मीडियावर नेहमीच चर्चेत असते. तिने तिच्या इन्स्टाग्रामवर नुकतीच एक पोस्ट शेअर केली आहे. ज्यामुळे आता पुन्हा एकदा ती चर्चेत आली आहे. मानसी नाईकच्या या पोस्टमुळे पुन्हा एकदा तिच्या वैवाहिक आयुष्यातील वादाच्या चर्चांना उधाण आलं आहे. मानसी नाईक आणि तिच्या पतीमध्ये वाद सुरू असल्याचं बोललं जात आहे.



# रबनें बना दी जोडी! दीपिका-रणवीरच्या त्या लूकवर चाहते फिदा..

अनेक दिवसांपासून दीपिका पदुकोण आणि रणवीर सिंग बरेच दिवस एकत्र दिसले नाहीत त्यामुळे त्यांच्या रिलेशनशिप बदल बऱ्याच अफवा पसरल्या होत्या. ते विभक्त होणार अशीही चर्चा होती. पण अखेर या चर्चांना काल पूर्णविराम मिळाला. एका सोहळ्यामध्ये दोघांनी एकत्र एंट्री घेतली आणि प्रेक्षक बघतच राहिले. त्यांच्या या एकत्र असण्याचा चाहत्यांना मोठा आनंद झाला आहे.




सध्या दीपिका पदुकोण (DEEPIKA PADUKON) आणि रणवीर सिंग हे कामासाठी जगभर फिरत आहेत त्यामुळे काही काळ ते एकत्र दिसले नाहीत, आता हे जोडपे 'GQ MEN OF THE YEAR 2022' पुरस्कारासाठी मुंबईत एकत्र आले तेव्हा त्यांच्या चाहत्यांना आनंद झाला. रणवीर एकट्याने कॅमेऱ्यासमोर पोज देताना दीपिकाने पाहिली आणि लवकरच ती त्याच्यासोबत फोटो काढायला आली आणि ते पाहून चाहते थक्क झाले. त्यांच्या केमिस्ट्रीची सध्या चर्चा आहे.

त्यांच्या या जोडीचे चाहत्यांनी खुप कौतुक केले आणि सोशलमिडियावर त्यांच्यावर कमेन्ट्सकहा जणू पाऊसच सुरू आहे. चाहते म्हणतात, “ते एकमेकांसाठी बनले आहे " तर एक म्हणतो "देवाने यांची जोडी शानदार बनवली आहे", तर एकाने म्हंटले आहे, “बहुतेक भारतातील बेस्ट जोडी आहे.", "आपल्या नवऱ्याला बघुन दीपिका भाऊक झाली" अशीही कमेंट एकाने केली आहे.

# “माधुरी दीक्षित ९० व्या दशकातील सुपरस्टार



रवीनाने माधुरी दीक्षितला नव्वदच्या दशकातील सुपरस्टार असं म्हणण्यावर आक्षेप घेतला आहे.



बॉलिवूड अभिनेत्री रवीना टंडन सध्या सोशल मीडियावर नेहमीच चर्चेत असते. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत रवीना टंडनने प्रसारमाध्यमाकडून पुरुष आणि महिला कलाकारांची ओळख सांगताना केल्या जाणाऱ्या भेदभावाकडे लक्ष वेधलं आहे. ‘केजीएफ २’ मधील आपल्या दमदार अभिनयामुळे चर्चेत आलेल्या रवीनाने माधुरी दीक्षितला नव्वदच्या दशकातील सुपरस्टार असं म्हणण्यावर आक्षेप घेतला आहे. यावेळी तिने अभिनेता सलमान खान आणि आमिर खानच्या नावाचाही उल्लेख केला आहे. अलिकडेच ‘हिंदुस्तान टाइम्स लीडरशिप समिट २०२२’मध्ये बोलताना रवीना टंडन म्हणाली, “जेव्हा आमिर खान २-३ वर्षांच्या ब्रेक घेतो आणि पुन्हा चित्रपटात काम करतो तेव्हा याला त्यांचं पुनरागमन किंवा ९० च्या दशकातील सुपरस्टार आमिर खान आता आपल्याबरोबर आहे असं म्हटलं जात नाही. आम्ही अभिनेत्रीही सातत्याने काम करतो पण मी अनेक आर्टिकल्समध्ये वाचलं आहे, ‘९० च्या दशकातील सुपरस्टार माधुरी दीक्षित आता हे करतेय किंवा ते करतेय’ असं लिहिलेलं असतं.” रवीना टंडन पुढे म्हणाली, “माधुरी दीक्षितने बॉलिवूडमध्ये बराच काळ काम केलं आहे.

# अमिताभ बच्चन यांच्या यंदाच्या चित्रपटांपैकी ‘ऊंचाई’ने पहिल्या दिवशी केली सर्वाधिक कमाई

बॉलिवूडचे महानायक अमिताभ बच्चन, बोमन इराणी, डॅनी डेन्झोंगपा, परिणीती चोप्रा आणि नीना गुप्ता यांच्या मुख्य भूमिका असलेल्या ‘ऊंचाई’ हा चित्रपट काल प्रदर्शित झाला. या चित्रपटाच्या घोषणेपासून प्रेक्षकांच्या मनात या चित्रपटाबद्दल खूप उत्सुकता होती. गेले अनेक दिवस ही सगळी कलाकार मंडळी विविध कार्यक्रमात या चित्रपटाच्या प्रमोशनच्या निमित्ताने झळकली. आता त्यांनी या चित्रपटासाठी घेतलेल्या मेहनतीचं फळ त्यांना मिळू लागलं आहे. नुकतीच या चित्रपटाच्या पहिल्या दिवशीच्या कमाईची आकडेवारी समोर आली आहे.

‘ऊंचाई’ या चित्रपटाची कथा आणि यातील कलाकारांचा दमदार अभिनय प्रेक्षकांना खुर्चीवर खिळवून ठेवण्यात यशस्वी झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. या चित्रपटाचे बजेट होते ४० कोटी. हा चित्रपट देशभरात ४८३ स्क्रीन्सवर दाखवला जात आहे. तर या चित्रपटाला एकूण १५०० शोज मिळाले आहेत. शात रिलीजच्या पहिल्याच दिवशी या चित्रपटाने १.६० कोटी ते १.८५ कोटीच्या घरात कमाई केल्याचे कळते. हा आकडा अमिताभ बच्चन यांच्या लॉकडाऊननंतर प्रदर्शित झालेल्या चित्रपटांच्या पहिल्या दिवशीच्या कमाईत सर्वात जास्त आहे.




लॉकडाऊननंतर अमिताभ बच्चन यांचे 3 चित्रपट प्रदर्शित झाले. त्यातील ‘चेहरे’ या चित्रपटाने पहिल्या दिवशी ४५ लाख, ‘गुडबाय’ने ९० लाख आणि ‘झुंड’ने १.१० कोटी कमाई केली होती. या चित्रपटांच्या मानाने ‘ऊंचाई’ने पहिल्या दिवशी खूप चांगली कमाई केली आहे.

# शाहीन आफ्रिदीचे इंग्लंडच्या फलंदाजांना ओपन चॅलेंज

## इंग्लंडच्या फलंदाजांना एक खुले आव्हान

**अॅडलेड । महाईन्यूज । वृत्तसंस्था**



पाकिस्तान आणि इंग्लंड यांच्यात टी-२० विश्वचषकाचा अंतिम सामना रविवारी (१३ नोव्हेंबर) रंगणार आहे. ऐतिहासिक मेलबर्न क्रिकेट मैदानावर दोन्ही संघ आमनेसामने येणार आहेत. पाकिस्तानने उपांत्य फेरीत न्यूझीलंडचा आणि इंग्लंडने भारताचा पराभव करून विजेतेपदाच्या लढतीत आपले स्थान निश्चित केले. या सामन्यापूर्वी पाकिस्तानचा खतरनाक वेगवान गोलंदाज शाहीन आफ्रिदीने इंग्लिश फलंदाजांना आव्हान दिले आहे.

आफ्रिदीने सामन्याच्या दोन दिवस आधी सांगितले आहे की, इंग्लंडच्या फलंदाजांसाठी त्याच्याविरुद्ध धावा करणे सोपे जाणार नाही. आफ्रिदीने दुखापतीतून पुनरागमन केले आहे. पहिले दोन सामने त्याच्यासाठी चांगले नव्हते. आफ्रिदीने भारताविरुद्ध ३४ आणि झिम्बाब्वेविरुद्ध २९ धावा दिल्या होत्या. त्यानंतर त्यांच्यावर टीका होऊ लागली. लोक त्याच्या फिटनेसवर शंका घेऊ लागले होते. परंतु आफ्रिदीने पुन्हा दमदार पुनरागमन करत टीकाकारांना शांत केले.

त्याने नेदरलँडविरुद्ध एक, दक्षिण आफ्रिकेविरुद्ध तीन, बांगलादेशविरुद्ध चार आणि न्यूझीलंडविरुद्ध दोन बळी घेतले. आफ्रिदीने टी-२० विश्वचषकात गेल्या चार सामन्यांमध्ये १० विकेट घेत खळबळ उडवून दिली होती. त्यांचा संघ एकवेळ बाहेर होणार होता, पण नेदरलँड्सने आफ्रिकन संघाचा पराभव केल्याने पाकिस्तानला जीवदान मिळाले. त्यानंतर पाकिस्ताने बांगलादेशचा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. तसेच न्यूझीलंडचा पराभव करून अंतिम फेरीत स्थान निश्चित केले.

# मेलबर्नवरील पाऊस पाहता ICC ने उचलले मोठे पाऊल!

## अतिरिक्त वेळेत वाढ करण्याचा घेण्यात आला निर्णय

**अॅडलेड। महाईन्यूज । वृत्तसंस्था**

**टी 20 वर्ल्डकप 2022 ची फायनल रविवारी मेलबर्न येथे पाकिस्तान आणि इंग्लंड यांच्यात होणार आहे. मात्र या सामन्यावर पावसाचे सावट आहे. जरी अतिरिक्त दिवसाची सोय असली तरी त्या दिवशी देखील पाऊस असल्याने आयसीसीचे टेन्शन वाढले होते. त्यामुळे आयसीसीने आपल्या नियमात बदल करत एक मोठा निर्णय घेतला आहे.**




आयसीसीने अतिरिक्त दिवसाच्या खेळाची वाढीव वेळ ही 2 तासावरून 4 तासावर नेली आहे. आयसीसीचे प्लेईंग कंडिशन नियाम क्रमांक 13.7.3 नुसार असामान्य परिस्थितीत सामन्याच्या ठरलेल्या वेळेपेक्षा अधिक दोन तास खेळ पुढे नेता येतो. मात्र टी 20 वर्ल्डकपची हाय व्होल्टेज फायनल पाहता सामना खेळवण्यासाठी आयसीसी शक्य तितके प्रयत्न करत आहे. त्यामुळेच अतिरिक्त वेळेत वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आयसीसी टी 20 वर्ल्डकपची रविवारची फायनल पावसात वाहून जाऊ नये म्हणून सगळे प्रयत्न करत आहे. जर रविवारी सामना पूर्ण होऊ शकला नाही तर तो सामना सोमवारी खेळवला जाईल. जर रविवारचा सामना पावसामुळे अर्धवट राहिला असेल तर तो सोमवारी जिथून सामना थांबला होता तिथून पुढे खेळवण्यात येणार आहे.

रविवारी सामना पूर्ण करण्यासाठी अर्धा तास अतिरिक्त वेळ राखून ठेवण्यात आली आहे. तर सोमवारी सामन्याच्या वेळेव्यतिरिक्त अधिकचे 4 तास राखून ठेवण्यात आले आहेत. जर सामना टाय झाला तर सुपर ओव्हरवर सामन्याचा निकाल लागले. जर सुपर ओव्हर पूर्ण होऊ शकली नाही तर पाकिस्तान आणि इंग्लंड यांना संयुक्तरित्या विजेतेपद बहाल करण्यात येईल.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही